दैनिक
शोषित, पीडित, दलित, वंचितांचा बुलंद आवाज
महाराष्ट्र सारथी

# घोगरे महाविद्यालयात सायबर सुरक्षेवर एक दिवसीय कार्यशाळा



**दै.महाराष्ट्र सारथी वृत्तसेवा**
**धुळे । प्रतिनिधी :**

क्विक फाउंडेशन पुणे व धुळे सायबर सेल महाराष्ट्र पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने एस.एस.व्ही.पी.संस्थेच्या विज्ञान महाविद्यालयात सायबर सुरक्षेकरता सायबर शिक्षा यावर एक दिवसीय कार्यशाळा दिनांक २३ ऑगस्ट २०२३ रोजी आयोजित करण्यात आली. सायबर हल्ला ही आता आंतरराष्ट्रीय पातळीवरील समस्या बनली आहे. तरी सायबर सुरक्षा बाबत जनजागृती करण्यासाठी क्विक हील फाउंडेशन पुणे यांनी विज्ञान महाविद्यालयातील संगणक शास्त्र विभागासोबत सामंजस्य करार केलेला आहे. त्याचसंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी धुळे सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल दिलीप वसावे यांनी विद्यार्थ्यांना धुळे जिल्ह्यात घडलेल्या विविध सायबर गुन्ह्यांबाबत माहिती देऊन जागृत केले. सायबर गुन्ह्याचा तपास कसा केला जातो व आपण सायबर हल्ल्यापासून काय खबरदारी घेऊन सुरक्षित राहू शकतो यावर मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की कुठल्याही प्रकारचा फ्रॉड तुमच्या सोबत झाल्यास घाबरून न जाता १९३० हा नंबर डायल करा जेणेकरून आम्ही त्वरित मदतीस येऊ. क्विक हिल फाउंडेशनच्या सीनियर एक्झिक्यूटिव्ह उढठ सौ.सुगंधा दाणी यांनी विद्यार्थ्यांना अगदी सोप्या भाषेत सायबर सुरक्षेचे महत्त्व पटवून दिले. आपली वैयक्तिक माहिती ही आपल्या जवळ असलेल्या पैशापेक्षाही किती महत्त्वाची आहे आणि आपण नकळत या सायबर हल्ल्यामध्ये कसे ओढले जाऊ शकतो व आपण स्वतःला कसे सुरक्षित ठेवू शकतो यावर मार्गदर्शन केले.

युवा पिढीचा समाजाला जागृत करण्यासाठी किती महत्त्वाचा वाटा आहे हे देखील पटवून दिले. कार्य शाळेच्या अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही.पाटील यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे महत्त्व विविध उदाहरणे देऊन समजावून सांगितले. सायबर सुरक्षेबाबत जागृत होऊन या मिशनमध्ये जास्तीत जास्त संख्येने विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन आपल्या कुटुंबाला , नातेवाईकांना, समाजाला जागृत करण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. या कार्यशाळेत श्री जानगवळी, समन्वयक उत्तर महाराष्ट्र विभाग हे प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक या मिशनच्या शिक्षक समन्वयक प्रा. डॉ.स्वाती बोरसे यांनी केले.

त्यांनी प्रास्ताविकात म्हटले की, या उपक्रमा अंतर्गत क्विक हील फाउंडेशन सायबर स्वयंसेवकांची निवड करेल व हे स्वयंसेवक आपल्या भागातील शाळा महाविद्यालयात जाऊन विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत प्रशिक्षण देतील, व या कार्यासाठी क्विक फाउंडेशन विद्यार्थ्यांना विद्यावेतन देणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रा. डॉ. रूपाली पाटील यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य प्रा. किशोर बोरसे, संगणक शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. राकेश देवरे तसेच सहकारी प्राध्यापक डॉ. एस .एन. कोतकर, प्रा. अशोक पवार, प्रा. राहुल चौधरी, प्रा. सायली नंदन, प्रा. किशोर देसले, प्रा. अमित उंबरे, प्रा. वैशाली पाटील तसेच विद्यार्थी समन्वयक जयेश गोरे, विद्यार्थिनी श्रुती विसपुते , विद्यार्थी गणेश पाटील यांनी सहकार्य केले. या कार्यशाळेत मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.